सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६४

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra
Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१९/विधिविषयक/प्र.क्र. ६(२०१९)/१०५०

दि. १४.११.२०१९

प्रकरण क्रमांक ६/२०१९

**जायकवाडी धरणाच्या पाण्याच्या पातळीची माहिती मिळण्याविषयी मा. श्री. बाळासाहेब मुरकुटे, विधान सभा सदस्य व इतर यांनी दाखल केलेला अर्ज.**

सोबत दि. १४/११/२०१९ चा मजनिप्रा आदेश क्र. ०९/२०१९ जोडला आहे.

सहपत्र : वरील प्रमाणे.

स्वाक्षरी
(रसिक चव्हान)
सचिव

प्रति: माहितीकरिता :

१) मा. श्री. बाळासाहेब मुरकुटे, विधान सभा सदस्य –नेवासा, ता. नेवासा, जि. अहमदनगर, ४१४६०३.
२) श्री. नानासाहेब एम. कराडे, रा. मुकींदपूर, ता. नेवासा, जि. अहमदनगर, ४१४६०३
३) श्री. दादासाहेब सी. वाघ, रा. उस्थळ दुमाळा, ता. नेवासा,जि. अहमदनगर, ४१४६०३
४) श्री प्रताप के चिंघे, रा.बाभुळवेडा, ता. नेवासा, जि. अहमदनगर, ४१४६०३

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

५) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ, १ ला माळा, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद–४३१००५.

६) मुख्य अभियंत, जल संपत्ती विभाग, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद–४३१००५.

७) अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जल संपत्ती विभाग, गजानन मंदिर समोर, गारखेडा, औरंगाबाद, ४३१००५ पूणे.

सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६४

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

**( महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण )**

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra
Water Resources Regulatory Authority Act, 2005)

आदेश क्रमांक : ०९/२०१९

**जायकवाडी धरणाच्या पाण्याच्या पातळीची माहिती मिळण्याविषयी मा. श्री. बाळासाहेब मुरकुटे, विधान सभा सदस्य व इतर यांनी दाखल केलेला अर्ज.**

१) मा. श्री. बाळासाहेब मुरकुटे,
विधान सभा सदस्य –नेवासा,
ता. नेवासा, जि. अहमदनगर, ४१४६०३.

२) श्री. नानासाहेब एम. कराडे,
रा. मुकींदपूर, ता. नेवासा,
जि. अहमदनगर, ४१४६०३

३) श्री. दादासाहेब सी. वाघ,
रा. उस्थळ दुमाळा, ता. नेवासा,
जि. अहमदनगर, ४१४६०३

४) श्री प्रताप के चिंघे,
रा.बाभुळवेडा, ता. नेवासा,
जि. अहमदनगर, ४१४६०३

५) मुळाधरण पाणी वापर संस्था,

मार्फत, अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व सदस्य ........... **यचिकाकर्ता**

**विरूध्द**

१) कार्यकारी संचालक,

गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळ,

१ ला माळा, सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद–४३१००५.

२) मुख्य अभियंत, जल संपत्ती विभाग,

सिंचन भवन, जालना रोड, औरंगाबाद–४३१००५.

३) अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास,

जल संपत्ती विभाग, गजानन मंदिर समोर,

गारखेडा, औरंगाबाद, ४३१००५ .......**प्रतिवादी**

**कोरम : श्री के. पी. बक्षी, अध्यक्ष**

**श्री व्ही. एम. कुळकर्णी, सदस्य**

**(ज.सं.अभियांत्रीकी)**

**श्री विनोद जे. तिवारी, सदस्य (विधि)**

**डॉ. एस.टी. सांगळे, सदस्य (इकानॉमिक्स)**

**दिनांक १४/११/२०१९**

**पार्श्वभूमि**

१. अपिलार्थींनी प्रतिवादी क्र. १ कडे दिनांक १४/०१/२०१९ ला व नंतर दि. १६/०१/२०१९ ला दुरूस्त केलेला, पैठण धरणाच्या पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्याकरीता केलेले विश्लेषण व

गोदावरी अभ्यास गटाचा उर्ध्व गोदावरी खो–याचा अहवाला संदर्भात काही माहिती घेण्यासाठी अर्ज केला. अर्जदाराच्या कथित सांगण्याप्रमाणे प्रतिवादी ही माहिती देण्यास टाळाटाळ करित होते. अपीलार्थी क्रं. २ व ३ यांनी या माहितीसाठी उपोषण देखील केले आणि जेव्हा प्रतिवादींनी माहिती दिली तेव्हा अपीलार्थीच्या मते त्यांनी मागितलेल्या माहितीशी जुळत नसल्याने, ती माहिती स्विकारली नाही.

२. अपीलार्थींनी या आधी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्रतिवादी क्र. ३ कडे अर्ज करून पैठण धरणाच्या पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्या विषयी माहिती मागवली. जी माहिती त्यांना मिळाली त्यावर ते समाधानी नव्हते, व त्यांनी मिळालेल्या माहिती बाबत शंका उपस्थित केली. या बाबत प्रतिवादी क्र. २ नी १ मार्च २०१९ सभा अपीलार्थी व प्रतिवादी क्र. ३ बरोबर सभा घेतली. या सभेत प्रतिवादी क्र. ३ ने जे स्पष्टीकरण दिले त्यावर अपिलार्थी समाधानी नव्हते. सभेच्या शेवटी प्रतिवादी क्र. २ नी प्रतिवादी क्र. ३ ला स्वयंस्पष्ट माहिती असलेली नोट अपीलार्थींना देण्याचे निर्देश दिले. या सभेच कार्यवृत्त प्रतिवादी क्र. २ नी दिनांक ७ मार्च २०१९ ला निर्गमित केले. त्याप्रमाणे स्वयंस्पष्ट माहिती असलेली नोट प्रतिवादी क्र. २ अपीलार्थीना दि. १९ मार्च २०१९ ला दिली.

३. प्रतिवादींच्या व्यवहाराने व्यथित होऊन अपीलार्थींनी प्राधिकरणाकडे, पैठण धरण मुळ अभिलेख्या प्रमाणे (१९६४–१९८५) व सिडब्ल्यु पी आर एस अहवाला प्रमाणे माहिती न दिल्यामुळे, दिनांक १३ मार्च २०१९ ला प्राधिकरणाकडे अपील केले.

४. प्राधिकरणाने अपीलाची तपासणी करून, प्रतिवादींना दिनांक ०३/०६/२०१९ व २७ जुलै २०१९ ला त्यांचे म्हणणे व शपथपत्राला उत्तर देण्यास नोटीस दिले. तथापी, प्रतिवादींनी त्याची अनुपालना केलेली नाही.

५. अभिलेख्यात जी कागदपत्रे होती, त्यावरून प्राधिकरणाला दिसुन आले की प्रतिवादींनी जी २ कागदपत्रे दिलीत, त्याप्रमाणे नदी पात्राच्या २ भिन्न पातळ्या दिल्याचे दिसुन आले. अपीलार्थींचा त्या कारणाने गोंधळ उडाल्यामुळे त्यांनी ठरवले की पैठण धरणाची साठवण क्षमता, जेवढी विचारात घेतली आहे, त्याच्या पेक्षा समन्यायी पाण्याच्या वितरणासाठी जास्त आहे, त्यामुळे ते प्रतिवादीकडे तसेच प्राधिकरणाकडे गेलेत.

## प्रार्थनेचा सारांश

६. अपिलार्थींनी त्याच्या प्राधिकरणाला केलेल्या प्रार्थने प्रमाणे, खाली दिल्याप्रमाणे, अनुतोष देण्याची विनंती केली.

१) सदरचे अपील खर्चासह मंजूर करण्यात यावे.

२) CWPRS नुसार (केंद्रीय जल आणि विद्युत अनुसंघान शाला) जायकवाडी डॅमची मुळ रेकॉर्ड १९६४ ते १९८५ प्रमाणे उंची बाबत, एम.डी.डी.एल. पातळीबाबत, हॉयड्रोपावर गेट तळ पातळी ते कालवा एम.डी.डी.एल. चे पाणीसाठ्यास काय म्हणून संबोधन्यात येते? याबाबत, डावा कालवा व उजवा कालवा गेट तळ पातळी बाबत? व डॅमची बांधकामे झाले तेथील नदीची तळ पातळी ते टॉप बॉटम लेव्हल पातळी डॅमची उंची बाबत आपले कार्यालयात सुनावणी घेऊन वरील सर्व बाबींची माहिती अपेलेन्ट यांना देण्यात यावी.

३) अपीलमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी असावी.

## प्राधिकरणा समोर चाललेले कामकाज

७. प्राधिकरणाने २ सुनावण्या घेतल्या (अ) दिनांक ०३/१०/२०१९ ला व (ब) १०/१०/२०१९. यामधे सर्व पक्षकारांनी त्यांची बाजु मांडण्यासाठी समान संधी देण्यात आली.

अ) दिनांक ०३/१०/२०१९ ला घेतलेल्या पहिल्या सुनावणीचा सारांश.

(१) सुनावणी साठी अपीलार्थी क्रं. २, प्रतिवादींचे प्रतिनिधी व त्याचे ॲडव्होकेट हजर होते. सुनावणी दरम्यान, अपीलार्थी क्रं. २, श्री नानासाहेब कराडे यांनी दुरूस्त केलेला अर्ज सादर करून केलेली प्रार्थना वाचुन दाखवली. त्यांना माहितीच्या अधिकाराच्या आधारावर जी माहिती प्राप्त झाली त्यामधे त्यांनी नायकवाडी प्रकल्पाच्या काही नियंत्रण पातळ्यांमधे तफावत असल्याबद्दल सांगितले.

(२) ॲड. यशोदीप देशमुख यांनी युक्तिवाद केला की अपीलार्थींचे अपील, माहितीचा अधिकाराच्या अंतर्गत जी माहिती मिळाली तिच्या खरेपणाविषयी आहे व या प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात असे अपील बसत नाही. मजानिप्राच्या अधिनियम २००५ च्या कलम २२ हे पाण्याचे हक्क देण्याबाबत अथवा ठरवण्याबाबत काही वाद असल्यास त्यासाठी आहे. अपीलार्थीचा अर्ज धरणाचे नियंत्रण पातळ्यांविषयी आहे, ना की हक्काविषयी. त्यामुळे हे अपील दाखल करून घेण्यायोग्य नाही व ते रद्द ठरवुन निकालात काढावे.

(३) ॲड. देशमुख पुढे म्हणाले की अपीलार्थींनी प्रतिवादीचे पत्र दिनांक ०७/०३/२०१९ च्या पत्राला आव्हान दिले आहे, जेव्हा की हे पत्र अधिनियमाच्या कलम २२ अंतर्गत आदेश नसुन, सभेचे ते कार्यवृत्त आहे. अपीलार्थींनी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता व त्यांना ती माहिती दिली होती. जर या माहितीच्या अधिकाराखाली मिळालेल्या माहितीने अपीलार्थींचे समाधान झाले नव्हते तर त्यांना योग्य त्या अपीलेट प्राधिकरणाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत, जाण्याची संधी होती. त्यांनी या प्राधिकरणाकडे येण्याची गरज नव्हती.

(४) श्री राजेंद्र पी. काळे, कार्यकारी अभियंता, जायकवाडी सिंचन विभाग, पैठण यांनी प्रतिवादींतर्फे सादर केले की अपीलार्थींच्या विविध माहितीचा अधिकारांतर्गत केलेल्या अर्जानुसार, जायकवाडी

प्रकल्प अहवाल १९६५ (मुळ) व १९६५ सुधारित अहवालातुन माहिती दिली होती. ते पुढे म्हणाले की जायकवाडी धरणामधे व्युत्क्रमी पंप आहे: आणि वीज निर्मिती नंतर पाणी परत जलाशयात सोडले जाते अशा प्रकारे अववाहा (पेनस्टॉक) मधुन सोडलेल्या पाण्याचा वापर होत नाही.

(५) अशाप्रकारे पक्षकारांनी बराच युक्तिवाद केल्यानंतर तसेच सुनावणी दरम्यान जी माहिती प्राप्त झाली त्यानंतर प्राधिकरणाने पुढील निर्देश जारी केलेत.

(१) प्रतिवादी क्रं. २ :– मुख्य अभियंता, ज. स. वि. औरंगाबाद यांनी शपथपत्र दाखल करावे ज्यामधे प्रकल्पाचे महत्वाचे मुद्दे, जसे जसे ते पुर्ण होत आले, त्यामधे मीटरमधे नियंत्रण पातळी तसेच पाणी साठवण द.ल.घ.ल. मधे, तसेच केंद्रीय जल विद्युत व अनुसंधान केंद्र, पूणे (CWPRS) ज्या उल्लेख अर्जात केलेला आहे, आणि मुळ व सुधारित जायकवाडी प्रकल्पाचे भाग व प्रती, दिनांक ०७/१०/२०१९ पर्यंत सादर कराव्यात.

(२) प्रकरणाची दुसरी सुनावणी १० ऑक्टोबर २०१९ ला १६.०० वाजता घेण्यात येईल.

**ब) दुसऱ्या व अंतिम सुनावणीचा दिनांक १० ऑक्टोबर २०१९ चा सारांश**.

१) सुनावणी साठी अपीलार्थी क्रं. २, प्रतिवादींचे प्रतिनिधी व त्याचे ॲडव्होकेट हजर होते. सुनावणी दरम्यान प्रतिवादी क्रं. २ यांनी काही कागदपत्रे सादर केलीत. श्री राजेन्द्र काळे, कार्यकारी अभियंता, जायकवाडी सिंचन विभाग, पैठण यांनी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे मार्फत शपथपत्र दाखल केले, ज्यामधे जायकवाडी प्रकल्प अहवाल १९६४, १९६५ व १९८५ आणि (CWPRS) चा अहवाल आहे.

२) ॲड. यशोदीप देशमुख म्हणाले की अपीलार्थींनी प्रतिवादीचे पत्र दिनांक ०७/०३/२०१९ चा संदर्भ दिला, परंतु हे पत्र अधिनियमाच्या कलम २२ अंतर्गत आदेश नसुन, ते केवळ सभेचे कार्यवृत्त आहे ज्याला आव्हान देता येत नाही. ॲड. यशोदीप देशमुख म्हणाले की अपीलार्थींनी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला होता व त्यांना ती माहिती दिली वेळोवेळी होती. जर अपीलार्थीना वाटले की या माहितीच्या अधिकाराखाली मिळालेली माहिती चुकीची/अपुरी आहे तर त्यांना योग्य त्या अपीलेट प्राधिकरणाकडे, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत, जाण्याची संधी होती. अपीलार्थींनी प्रतिवादीचे पत्र दिनांक ०७/०३/२०१९ चा संदर्भ दिला, परंतु हे पत्र अधिनियमाच्या कलम २२ अंतर्गत आदेश नसुन, ते केवळ सभेचे कार्यवृत्त आहे ज्याला आव्हान देता येत नाही.

३) जी कागदपत्रे सादर करण्यात आली त्यावरून प्राधिकरणाला आढळुन आले की CWPRS अहवाल हा पैठण धरणामधे विशिष्ट स्तरांच्या मधे जो गाळ जमा झाला होता त्याच्या विद्यमान स्थिति विषयी आहे. त्यामधे भौतिक दृष्टया किंवा दूर संवेदनाव्दारे पैठण धरणाच्या पाण्याचे स्तर मोजलेले नाहीत.

४) श्री राजेन्द्र काळे, कार्यकारी अभियंता, जायकवाडी सिंचन विभाग, पैठण यांनी सांगितले की पैठण धरणाला तीन निर्गम आहेत, एक वीज निर्गम व दोन कालवे निर्गम. कालवा निर्गमांची तळपट्टी (सील) ४५२.१७० मीटर आर.एल वर आहे. MDDL ही ४५५.५२ मीटर आर एल वर आहे. MDDL च्या खाली असलेली साठवण मृत साठवण आहे, जी पाणी नियोजनासाठी विचारात घ्यायची नसते.

५) अपीलार्थी यांनी युक्तिवादात सांगितले की प्रकल्प प्राधिकऱ्यांनी चलाखीकरून कंटेंट टेबल बदलला आहे ज्यामुळे जी साठवण दाखविली जाते त्यापेक्षा ती जास्त असते. अशाप्रकारे प्रकल्प प्राधिकारी जास्त पाणी वापरत आहेत.

६) अपीलार्थींनी हे देखील दाखवून दिले की जलाशयाचा जलस्तर MDDL पेक्षा खाली गेल्यावर देखील कालव्यात पाणी सोडण्यात येते.

७) उत्तरादाखल प्रतिवादींनी सांगितले की अपवादात्मक परिस्थिती मधे मृत साठवणीतुन पाणी पेयजला करीता सोडण्यात येते.

## मुद्दे साचेबध्द करणे

८) प्राधिकरणाने आलेल्या अर्जाचा विचार करून, त्यात सांगितलेल्या मुद्यांचा विचार करून, पक्षकारांनी सादर केलेले त्यांचे म्हणणे व कागदपत्रे जी अभिलेखात आहेत, ते सर्व लक्षांत घेऊन खाली दिलेले मुद्दे विचारार्थ व न्यायार्थ, साचेबध्द केले आहेत.

**(१) अपीलार्थी अपील दाखल करण्यास पात्र आहे काय ?**

**(२) सदर अपील, मजानिप्रा अधिनियम २००५ प्रमाणे, दाखल करून घेण्या योग्य आहे काय?**

**(३) पैठण धरणाच्या नदी पात्राची पातळी जी CWPRS च्या तांत्रिक अहवाल क्र. ४३२७ (एप्रिल २००६) मधे दिली आहे त्याचा पैठण धरणाच्या पाणी साठवणीच्या क्षमतेवर काही परिणाम होतो काय ? आणि प्रतिवाद्यांनी जायकवाडी धरणाची वास्तविक साठवण क्षमता कमी दाखविली आहे काय?**

**(४) प्रतिवादींना, व्यापक जनहितार्थ काही निर्देश देणे आवश्यक आहे काय ?**

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

(९) केलेल्या युक्तिवादावर विचार करून अभिलेखनात दिलेली माहिती विचारात घेऊन वर दिलेल्या मुद्यांवर प्राधिकरणाने निवाडा केला आहे. प्राधिकरणाचे वरील मुद्यांवरील निष्कर्ष असे आहेत.

**(१) अपीलार्थी अपील दाखल करण्यास पात्र आहे काय ?**

मजनिप्रा (कामकाज चालवणे) नियमन २०१३ मधील खंड ११ (२) याप्रमाणे आहे:—

(२) फक्त खाली दिलेल्या प्रवर्गाचे घाऊक पाणी वापरकर्ते प्राधिकरणाकडे याचिका दाखल करण्यास पात्र आहेत.

(अ) लघु स्तर, वितरणीका स्तर, कालवा स्तर, प्रकल्प स्तर, नैसर्गिक प्रवाह यंत्रणांच्या पाणी वापरकर्ते संस्था.

(ब) घरगुती पाणी वापरणारे सुविधा केन्द्र / संस्था जसे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, महानगर पालिका, नागरी स्थानिक संस्था, ग्रामपंचायत

(क) औद्योगिक पाणी वापरणारे जसे खाजगी मालकीच्या औद्योगिक वसाहती

(ड) इतर घाऊक औद्योगिक वापरकर्ते ज्यांनी जलसंपत्ती विभागाशी करार केला आहे.

(इ) अशी एखादी पंजीकृत संस्था जी वरच्या पैकी कोणाचेही अधिकृत प्रतिनिधित्व करते.

२) अपीलार्थी १ ते ४ व्यक्ती आहेत, परंतु अपीलार्थी क्र. ५ ही मुळा पाणी वापर संस्था आहे. नियमनातील खंड ११ (२) मधील तरतुदी विचारात घेता, अपीलार्थी क्र. ५ याचिका दाखल करण्यास पात्र आहे.

अशा प्रकारे, या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.

**(२) सदर अपील, मजानिप्रा अधिनियम २००५ प्रमाणे, दाखल करून घेण्या योग्य आहे काय ?**

१) **सदर अपील, मजानिप्रा अधिनियम २००५** ही बैठक अपीलार्थी व प्रतिवादी क्रं. २ व ३ मधे झाली होती. हे केवळ या बैठकीचे कार्यवृत्त आहे. तो PDRO ने मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे आदेश नाही.

२) या बैठकीत, जी माहिती, माहितीच्या अधिकाराच्या अपीलार्थींच्या प्रतिवादी क्रं. ३ ला सादर केलेल्या पत्रात विचारली होती, त्यावर चर्चा झाली.

३) प्रतिवादींनी युक्तिवाद केला की यावर फक्त माहितीच्या अधिकाराच्या अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागु होतात आणि मजनिप्रा अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागु होत नाही.

**निष्कर्ष :** प्राधिकरणाने विचारानंतर ठरविले की अपीलार्थींनी नियंत्रण पातळी विषयी चुकीची माहिती दिली आणि जायकवाडीच्या साठवण क्षमते बद्दल चलाखी केल्याचे, जे अप्रत्यक्ष रित्या समन्यायी पाणी वितरणाशी व त्यामुळे अपीलार्थीच्या पाणी हक्काशी संबंधित आहे म्हणुन याची पडताळणी करावी.

**३) पैठण धरणाच्या नदी पात्राची पातळी जी CWPRS च्या तांत्रिक अहवाल क्र. ४३२७ (एप्रिल २००६) मधे दिली आहे त्याचा पैठण धरणाच्या पाणी साठवणीच्या क्षमतेवर काही परिणाम होतो काय? आणि प्रतिवाद्यांनी जायकवाडी धरणाची वास्तविक साठवण क्षमता कमी दाखविली आहे काय?**

अ) जायकवाडी धरण पुर्ण झाल्यावर पहिले १९७६ मधे केले. CWPRS पूणे यांनी जायकवाडी जलाशयाचे जमणाऱ्या गाळाचे मुल्यांकन उपगृह सुदूर संवेदना तंत्र वापरून केले व हा मुल्यांकन अहवाल एप्रिल २००३ मधे प्रकाशित केला.

ब) प्राधिकरणाने या अहवालाची तपासणी केली आणि असे आढळले की CWPRS ने उपग्रह प्रतिमा १९९९ ते २००३ च्या काळातील, या अभ्यासाकरिता वापरल्यात. या अहवालाच्या अनुच्छेद ४.१ मधे दिल्यानुसार १९७६ ची क्षमता तक्ता–१ खाली दिला आहे. त्याप्रमाणे नदी पात्र पातळी, MDDL, FRL त्यांची अनुक्रमे साठवण खाली दिली आहे :–

| **स्तर/पातळी** | **उंची (मी)** | **क्षमता (द.ल.घ.मी.)** |
|---|---|---|
| नदी पात्र पातळी | ४३८.९१२ | ०.०० |
| MDDL | ४५५.५२४ | ७३८.१०६ |
| FRL | ४६३.९०६ | २९०९.०४१ |
| MWL | ४६५.५८२ | ३६४८.३३९ |

क) परिशिष्ट–२– महत्वाचे मुद्दे अहवालातील ७ व्या क्रमांकावर नियंत्रण पातळया दिल्या आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) | नदी पात्र पातळी | ४३१.२१० |
| (२) | MDDL | ४५५.५२४ |
| (३) | FRL | ४६३.९०६ |
| (४) | MWL | ४६५.५८३ |
| (५) | धरण शिर्ष | ४६८.९४० |

ड) अशा प्रकारे CWPRS च्या अहवालात नदी पात्र पातळीचे आकडयामधे २ वेगवेगळ्या अनुच्छेदात विसंगतता आढळुन आली आहे. प्रस्तुत याचिका या विसंगतते मुळे केली असल्याचे आढळते.

इ) या अहवालाच्या तक्ता क्रं. ४ मधे उपग्रह आकडेवारीचा तपशील, दोन भिन्न तारखेला उपग्रह जलाशयाच्या पाण्याच्या पातळीवरून गेल्याचे विषयी दिला आहे. या आकडेवारीची तपासणी केल्यावर प्राधिकरणाला आढळले की CWPRS ने, जेव्हा जलाशयाची पातळी ४५५.१८३ व ४६३.८७३ च्या दरम्यान होती, तेव्हा या उपग्रह प्रतिमा वापरल्या आहेत. यावरून दिसुन येते

की नदी पात्राची पातळी जी जोडपत्र क्र.२ मधे महत्वाचे मुद्दे म्हणुन दिली आहे, तो अहवालातुन उचलला आहे. पुढे, किमान नदी पात्राची पातळी जी घळीच्या भागात उपलब्ध आहे. त्याचा जायकवाडी सारख्या मोठया धरणावर त्याच्या साठवण क्षमतेवर होणारा परिणाम नगण्य असतो. MDDL पातळीपर्यंत असलेले पाण्याला मृत साठवण समजतात आणि या पाण्याची पातळी १९७६ पासुन यथायोग्य आहे.

फ) प्राधिकरणाला आढळले की जायकवाडी धरणाच्या मृत साठवणीमधे चल साठवणी मधे व एकुण साठवणी क्षमते मधे १९७६ च्या क्षेत्र क्षमता वक्रते प्रमाणे काही बदल झालेला नाही. (पहा तक्ता क्र. १ CWPRS अहवाल), महत्वाचे मुद्दे जे जोडपत्र–२ मधे अहवालात दिले आहे व त्याचप्रमाणे सुधारित प्रकल्प अहवाल, यांच्यात काहीही बदल नाही, ते जसेच्या तसे आहेत.

**निष्कर्ष:** प्राधिकरण या निष्कर्षाप्रत झाले आहे की प्रकल्प प्राधिकाऱ्यांनी नियंत्रण पातळी व साठवण क्षमतेच्या आकडयामधे कोणतीही चलाखी केलेली नाही यामधे अपीलार्थीनी केलेला कथित आरोप चुकीचा आहे, त्याला आधार नाही व तो टिकण्यासारखा नाही. या मुद्याचे उत्तर नकारार्थी येते.

**४) प्रतिवादींना, व्यापक जनहितार्थ काही निर्देश देणे आवश्यक आहे काय ?**

अ) प्राधिकरणाला आढळले की CWPRS अहवालानंतर MERI ने सुध्दा जायकवाडी धरणात गाळ जमण्या विषयी अभ्यास केला. MERI च्या दिनांक २९ मे २०१४ च्या अभ्यासाप्रमाणे जायकवाडी धरणाची चल साठवण १७८.९४८ द.ल.घ.मी. ने (२७%) कमी झाली आहे. ही जलाशयाच्या चल क्षमतेमधील आलेली कमी लक्षणीय आहे.

ब) MERI ने सुधारीत क्षेत्र क्षमता वक्रता सुध्दा या चल क्षेत्रासाठी दिली आहे.

क) प्राधिकरणाचे मत आहे की प्रकल्प प्राधिकाऱ्यांनी त्यांच्या कंटेट टेबल मधे बदल करावा मेरी ने प्रस्तावित केलेल्या कटेट टेबल ची वैधता तपासुन व तो बदल, गोंधळ टाळण्यासाठी, जाहीर करावा. तसेच अद्यावत साठवण क्षमता देखील सर्व तयार होणा—या अहवालात वापरण्यात यावी.

आणि म्हणुन, या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.

## निर्देश

१०. वादामधे असलेल्या पक्षकारांचे म्हणणे ऐकुन, जी माहिती व आकडेवारी अभिलेखात आहे त्यांचा विचार करून व जे मुद्दे साचेबध्द केले आहेत, त्यावर निवाडा दिल्यानंतर, प्राधिकरण खालील प्रमाणे निर्देश देते.

(१) प्रतिवादी क्र. २ नी त्यांच्या कंटेट टेबल मधे बदल करावा. मेरी ने प्रस्तावित केलेल्या कंटेट टेबल ची वैधता तपासुन व तो बदल, गोंधळ टाळण्यासाठी, जाहीर करावा. तसेच त्यानंतर अद्यावत साठवण क्षमता देखील सर्व तयार होणाऱ्या अहवालात वापरण्यात यावी. अपील अशाप्रकारे निकालात खर्चाविना काढले आहे.

| | | |
|---|---|---|
| स्वा. | स्वा. | स्वा. |
| (डॉ. एस.टी. सांगळे) | (विनोद जे. तिवारी) | (व्ही. एम. कुळकर्णी) |
| सदस्य (इकॉनॉमिक्स) | सदस्य (विधि) | सदस्य (ज.सं. अभियांत्रिकी) |

स्वा.
(के. पी. बक्षी)
अध्यक्ष